# पंचायत समिती सुरगाणा जि.नाशिक

**महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकिय कर्मव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ मधील ८ मधील तरतुदीनुसार पंचायत समिती सुरगाणा नागरिकांची सनद प्रसिध्द करीत आहे.**

## -::- नागरिकांची सनद -::-

**नागरिकांची सनद:-**

नागरिकांची सनद म्हणजे सरकारचे लोकांसाठीचे उत्तरदायित्व (Accountability) दर्शविणारा दस्तऐवज असतो. जनतेच्या अपेक्षा वाढत आहेत. त्या पूर्ण करण्याच्या दिशेने सरकारने टाकलेले पाऊल म्हणजे नागरिकांची सनद होय. महाराष्ट्र शासकीय कामात विलंब करण्यास प्रतिबंध करण्याचा अधिनियम,२००५ मधील कलम १० मध्ये आता नागरिंकांच्या सनदेची तरतुद केली असल्याने नागरिकांची सनद प्रसिध्द करणे ही प्रत्येक विभागाची व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांची कायदेशीर जबाबदारी आहे.

**प्रस्तावना-::-**

**१. पंचायत समिती सुरगाणा** जिल्हा परिषद,नाशिक मधील एक विभाग असुन त्यात सर्वसाधारण १५ संकलन असुन, प्रशासन,आस्थापना १ ते ३, आवक-जावक, अर्थ,कृषि,पशुसंवर्धन, आरोग्य,ग्रा.पं.समाजकल्याण,सांख्यिकी,म.ग्रा.रो.ह.यो.,शिक्षण,इंदिरा आवास योजना, अर्थसंकल्प, विस्तार अधिकारी यांच्या फिरती कार्यक्रम व मासिक दैनंदिनी मंजुर करणे, पंचायत समिती निवास वाटप, पंचायत समिती सर्वसाधारण सभा,समन्वय सभा वा इतर सभेची माहिती संकलीत करणे, जिल्हा परिषद वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांच्या आस्थापना विषयक कामे करणे.

विविध विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांच्या कार्यपुर्तिचे वेळापत्रक परिशिष्ट १ मध्ये स्तंभ क्रमांक ४ येथे सादर करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासकिय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकिय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम ११ मध्ये नमुद केलेल्या एकुण ६ बांबी खालील प्रमाणे

**(एक)** न्यायप्रविष्ट बाबी.

**(दोन)** लोक आयुक्त किंवा उप लोक आयुक्त आणि अन्य घटनात्मक संस्था, आयोग,इत्यादी

**(तीन)** न्यायिकवत् बाबी

**(चार)** केंद्र किंवा अन्य राज्य शासनांच्या संबंधातील प्रकरणे.

**(पाच)** विधि विधानाशी संबंधातील बाबी.

**(सहा)** मंत्रिमंडळास सादर होणाऱ्या मुख्य धोरणात्मक बाबीसंबंधीची प्रकरणे.

वरिल एकुण ६ (सहा) बाबी कार्यपुर्तिच्या वेळापत्रकातील परिशिष्ट १ मधील स्तंभ क्रमांक ४ येथील वेळापत्रकातुन सुट राहील.

## ५.(अ) गऱ्हाणी/तक्रारी यांचे निराकरण -::-

कार्यपुर्तीस होणार विलंब वा अन्य काही ग-हाणी असल्यास त्यासंबंधी परिशिष्ट १ मधील स्तंभ क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या अधिकाऱ्याकडे तक्रार नोंदविता येईल व तक्रार प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांत त्याची पुर्तता करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची राहील. यानंतरही नागरिकांचे समाधान न झाल्यास संबंधित म.मुख्य कार्यकारी अधिकारी/अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नाशिक यांचेकडे याबाबत त्यांना तक्रार करता येईल. गऱ्हाणी समक्ष भेटीने/पत्राव्दारे मांडता येतील.

## ५.(ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा/सिंहावलोकन -::-

या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबत तथा परिणामकारकतेचा आढावा पशुसंवर्धन विभागाकडून दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

## ५.(क) जनसामान्यांकडून सूचना -::-

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सुचनांचा गांभीर्यपुर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. पंचायत समिती सुरगाणा अधिनस्त येणाऱ्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमीच सहकार्य करेल.

## ६. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी -::-

पंचायत समिती सुरगाणा नागरिकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटीबध्द् आहे. पशुसंवर्धन विभाग आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्ये भावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरवितांना नागरिकांना सौजन्यपुर्ण वागणूक देण्याची जबाबदारी विभागातील प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांची राहील.

महाराष्ट्र शासकिय कर्मचाऱ्याचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १० (१) मधील तरतुदीस अनुसरुन प्रत्येक शासकिय कर्मचारी,त्यास नेमून दिलेल्या किंवा त्याच्याशी संबंधित असलेले शासकिय कर्तव्य व शासकीय काम अत्यंत दक्षतेने आणि शक्य तितक्या शीघ्रतेने पार पाडण्यास बांधील असेल.

सर्वसाधारणपणे,कोणतीही फाईल विभागातील किंवा कार्यालयातील कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याकडे कामाच्या सात दिवसांपेक्षा अधिक काळ प्रलंबित राहणार नाही.परंतु तात्काळ आणि तातडीच्या स्वरुपाच्या फाईली, त्या प्रकरणाच्या निकडीनुसार शक्य तितक्या शिघ्रतेने आधि प्राधान्याने तात्काळ फाईल शक्यतो एका

दिवसांत किंवा दुसऱ्या दिवशी सकाळी आणि तातडीच्या स्वरुपाची फाईल शक्यतो चार दिवसांत निकाली काढण्यात येईल.परंतु दुसऱ्या कोणत्याही विभागाकडे विचारार्थ पाठवावयाची आवश्यकता नसलेल्या फाईलींच्या संबंधात संबंधित विभाग त्या प्रकरणावर पंचेचाळीस दिवसांच्या आत निर्णय घेईल आणि आवश्यक ती कार्यवाही करील आणि दुसऱ्या कोणत्याही विभागाकडे विचारार्थ पाठवावयाची आवश्यकता असलेल्या फाईलींच्या संबंधात तीन महिन्याच्या आत निर्णय घेण्यात येईल आणि आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.